# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** गांधी नगर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0025 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 21/01/2025 03:06

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 20/01/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 20/01/2025
**Time Period (कालावधी):** पहर 7 **Time From (वेळेपासून):** 19:24 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 20:29 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 21/01/2025 **Time (वेळ):** 02:45 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 007
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 21/01/2025 02:49 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 7 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** उचगाव ते सरनोबतवाडी जाणारे सर्

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): रोहित बाबासो शिंदे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1998

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रेंदाळ, ,ता हातकणंगले, जि कोल्हापूर ,गांधी नगर,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रेंदाळ, ,ता हातकणंगले, जि कोल्हापूर ,गांधी नगर,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9168837054

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अविनाश अशोक सुतार | | - | 1. हनुमान मंदिर जवळ,हासुर दुमला, ताकरवीर, जिकोल्,गांधी नगर,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 10,000/ रूपये | 10,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

10,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No. (अ.क्र.)** | **UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.)** |
| --- | --- |

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 21/01/2025

रोहित बाबासो शिंदे, वय - 27 वर्षे, व्यवसाय - नोकरी, रा. रेंदाळ, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर मोबाईल नंबर 9168837054 समक्ष पोलीस ठाणेस हजर राहुन फिर्याद देतो की,

मी दिनांक 20/01/2025 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर येथे येवुन पोलीस उपअधीक्षक वैष्णवी पाटील यांची भेट घेवुन माझेकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत तक्रार सागितली की, माझ्या आई सुरेखा बाबासो शिंदे यांचे नावे शासनाच्या रमाई आवास घरकुल योजना सन 2023- 2024 मधुन घरासाठी लाभार्थी म्हणुन 1,50,000/- रूपये मंजुर झालेले आहेत. मंजुर झालेले पैसे 05 टप्यामध्ये मिळातात त्याप्रमाणे 03 टप्याचे पंधरा हजार, चाळीस हजार व पंचेचाळीस हजार असे 1,00,000/- रूपये माझ्या आईच्या बॅंक ऑफ इंडीया,शाखा हुपरी येथील खात्यावर जमा झाले आहेत. उरलेले 02 टप्याचे पैसे कधी जमा होणार हे विचारण्यासाठी मी दिनांक 10/01/2025 रोजी हातकणंगले पंचायत समिती येथे गेलो होतो. त्यावेळी तेथे मी रमाई आवास घरकुल योजनचे काम पाहणारे अविनाश सुतार, ग्रामिण गृहनिर्माण अभियंता जि.प.उप विभाग बांधकाम हातकणंगले यांना भेटलो त्यावेळी त्यानी माझेकडे रमाई आवास घरकुल योजनेचे राहीलेले हप्ते जमा करणेसाठी 13,000/- रूपये दया त्याशिवाय राहीलेले हप्ते जमा होणार नाहीत असे म्हणाले त्यावेळी मी त्यांना काय तरी कमी करा असे म्हणालो असता त्यांनी पैसे कमी करण्यास नकार दिला त्यावेळी मी त्यांना पैशाची जुळणा करून तुम्हाला येवुन भेटतो असे सांगितले होते. मी सुतार साहेब यांना दिनांक 20/01/2024 रोजी त्यांचा फोन आलेनंतर मी त्यांना भेटणेस जाणार असुन त्यांचेवर आपणाकडुन कायदेशीर कारवाई व्हावी म्हणुन तक्रारी अर्ज लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलीस उप अधीक्षक वैष्णवी पाटील मॅडम यांचेकडे दिला होता. त्यावेळी पाटील मॅडम यानी पोलीस निरीक्षक आसमा मुल्ला यांना बोलावुन घेवुन त्या पुढील कारवाई करतील असे सांगितले. त्यावेळी मी मुल्ला मॅडम यांना माझी वरीलप्रमाणे तक्रार सांगितली. त्यावेळी पाटील मॅडम यांनी मला सुतार यांचा फोन आलेनंतर कळवा असे सांगितले होते. मला सायंकाळी 06.15 वा चे सुमारास सुतार यांचा फोन आला त्यावेळी त्यांनी मला ते शिरोली येथे सांगली फाटा येथे कोरेगावकर पेट्रोल पंप येथे सायंकाळी 07.00 वा भेटणेस या असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना येतो असे म्हणालो. त्यानंतर मी पाटील मॅडम यांना फोन करून सुतार यांचा फोन आलेबाबत सांगुन त्यांनी भेटणेस बोलाविले असल्याचे सांगितले त्यावेळी पाटील मॅडम यांनी मला शिरोली येथील पिर बालेसाब दर्गाजवळ थांबणेस सांगुन त्या थोडयावेळात तेथे येत असल्याचे सांगितले. त्यानंतर काहीवेळाने दर्गाजवळ पाटील मॅडम व मुल्ला मॅडम स्टाफसह आल्या त्यावेळी मुल्ला मॅडम यांनी मला शासकीय दोन्ही पंच, स्टाफ यांची ओळख करून दिली त्यांचे सुचनेवरून पंचानी मला माझी तक्रार विचारली त्यावर मी त्यांना वरील प्रमाणे माझी तक्रार सांगितली. त्यानंतर मुल्ला मॅडम यांनी पुढील कारवाई येथुनच करण्याचे आहे असे सांगुन त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डरची संपुर्ण माहिती आम्हांला देवुन अविनाश सुतार, ग्रामिण गृहनिर्माण अभियंता जि.प.उप विभाग बांधकाम हातकणंगले यांच्या लाच मागणीचे अनुषंगाने पडताळणी बाबत आवश्यक सुचना दिल्या. त्यानंतर मी माझेवरील मोबाईल वरून सुतार यांचे मोबाईल क्रमांक 9579100386 वरती दोन वेळा फोन केला असता त्यांना शिरोली येथे कोरेगांवकर पेट्रोल पंपावर येण्यास सांगितले. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर चालु करून तो माझ्याकडे देवुन मला व पंच नं.1 पाटील यांना अविनाश सुतार यांना भेटणेकरीता शिरोली फाटा कोरेगांवकर पेट्रोल पंपाजवळ पाठविले. आम्ही माझेकडील मोटर सायकलवरून कोरेगांवकर पेट्रोल पंपावरती गेलो. तेथे पंपाचे बाजुला रोडजवळ सुतार साहेब थांबलेली मी पाहीले. त्यावेळी मी तेथे जावुन सुतार यांना भेटलो त्यावेळी आमचेत आमचे कामाचे अनुषगाने बोलने झाले. तसेच नेमक किती पैसे दयायचे या अनुषंगने बोलने झाले त्यावेळी सुतार यांनी मला" तेरा काय झाल तेराच कर... " असे म्हणाले त्यावेळी मी " तेरा हजार रूपये देवु.. " असे म्हणालो त्यावेळी सुतार " हुं.. " असे म्हणाले त्यावेळी मी " तेवढ लय होतय, थोड काय तरी कमी करा म्हणजे, फुल फायनल दिली रक्कम म्हणजे तुमी रिकाम होताय, दोन काम खर

रविला परत काय देणार नाही, तुम्हालाच तेवढ ते, कारण तेन दमवलाय आपल्याला लय..“ असे म्हणालो. त्यावेळी सुतार ” किती दहा देणार मग ..“असे म्हणाले. त्यावेळी मी ” दहा वर फायनल करा खर दहा वर...“ असे म्हणालो. त्यावेळी सुतार ” चालतय ..“ असे म्हणाले. त्यावेळी मी ”तुम्ही मग हितच थांबणार काय ...“ असे विचारले त्यावेळी सुतार ” होय थांबतो की..“ असे म्हणाले. त्यानंतर तेथुन मी व पंच परत निघुन येवुन मुल्ला मॅडम व पाटील मॅडम यांना घडलेली हकीकत सांगितली. अविनाश सुतार यांनी माझेकडे 13,000/- रूपयाची मागणी करून तडजोडीअंती 10,000/- रूपयांची मागणी करून सदरचे पैसे लागलीच घेवुन येण्यास सांगितल्याचे निषन्न झाले.

त्यानंतर मुल्ला मॅडम यांनी सापळा कारवाई सुरू केली. त्यावेळी मुल्ला मॅडम यांनी मला व पंचाना अॅंथ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगितले. त्यानंतर सापळा कारवाईचे अनुषंगाने सापळा पुर्व संपुर्ण कार्यवाही केलेनंतर अॅंथ्रासिन लावलेले 10,000/- रूपये माझे शर्टचे वरच्या डाव्या खिशात ठेवुन मला व पंचाना योग्य त्या सुचना दिल्या व अविनाश सुतार हे आता कोठे आहेत याकरीता त्यांना फोन लावणेस मुल्ला मॅडम यांनी सांगितले त्याप्रमाणे मी सुतार साहेब यांना फोन लावला त्यावेळी मी त्यांना ” साहेब पैसे भेटल्यात कुठ येवु तिथच हाय काय तुमी “ असे म्हणालो त्यावेळी सुतार यांनी मी आलोय हो दादया पुढ पाचगाव मध्ये आपल उचगाव मध्ये उचगाव फाटयाला “असे म्हणुन त्यांनी मला उचगाव फाटा येथे येण्यास सांगितले. त्याप्रमाणे सुतार साहेब यांना भेटण्याकरीता उचगाव फाटा येथे जाण्याचे ठरले. त्यानंतर रेकॉर्डर सुरू करून तो माझेकडे दिला. त्यानंतर मी व पंच पाटील असे माझे मोटार सायकलवरून निघालो. माझे पाठोपाठ सापळा पथक आले. मी उचगाव फाटा येथे आलो तेथे सुतार साहेब हे मला दिसले नाहीत म्हणुन मी तीन वेळा फोन केला असता त्यांनी फोन उचलला नाही म्हणुन मी त्यांना टेक्स मेसेज घरी जाऊ का असे म्हणुन केला. त्यानंतर सुतार यांचा मला फोन आला व त्यानी ते उचगाव फाटयाचे थोडे पुढे सर्व्हिस रोडला थांबल्याचे सांगितले. त्यानंतर मी सदर ठिकाणी गेलो त्यावेळी माझे पाठोपाठ सापळा पथक आले. सर्व्हिस रोडला सुतार त्यांची मोटर सायकल फसीनो एम.एच.10 सी.एफ.1864 घेवुन थांबलेले दिसले मी तेथे जावुन त्यांना भेटलो. त्यावेळी आमचेत कामाचे अनुषंगाने बोलने झाले. त्यावेळी ” मी एटीएम मधी त्यांना पैशाचा पासवर्ड समजना मग नंतर जनरेट केला नी मग काढल, जावु मला घरातन सारख फोन यालाय आणि वडील पण म्हणल्यात जा, धरा मेजुन घ्या दहा हजार रूपये हाईत..“ असे म्हणालो त्यावेळी सुतार ” काय आडचण नाही, ठेव.... हाईत ना.. “ असे म्हणुन त्यांनी त्यांचे मोटर सायकलची सिट खालील डिग्गीत ठेवणेस सांगितले. त्यावेळी मी ” मेजुन घ्या... असे म्हणालो. त्यावेळी सुतार ” हाईत नव्ह, हाईत आसुदे ठेव आसुदे ठेव “ असे म्हणाले. त्यावेळी मी ” अहो नंतर मागण काय बघा ..“ असे म्हणालो त्यावेळी सुतार ” आसुदे ठेव...“ असे म्हणाले त्यावेळी मी ” तुम्ही मेजला तर मला हे व्हायला.. “ असे म्हणालो. त्यावेळी सुतार नाही नाही हाईत ठेव व्यवस्थित, हाईत ना... असे म्हणाले. त्यावेळी मी सुतार यांनी माझेकडे मागणी केलेले 10,000/- त्यांचे सांगणेवरून मोटर सायकलचे सिट खालील डिग्गीत ठेवले. त्यानंतर आमचेत कामाचे अनुषंगाने बोलने चालु असताना मी पैसे स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला. त्यानंतर लगेच मुल्ला मॅडम, पाटील मॅडम आणि त्यांचा स्टाफ तेथे आला. त्यावेळी सापळा पथकाने लाच स्विकारलेल्या रक्कमेसह अविनाश सुतार यांना पकडले. सदर ठिकाणी लाचेच्या सापळ्यातील प्राथमिक तपासण्या केल्या. त्यानंतर पुढील सर्व कार्यवाही ही अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कार्यालयात येवुन पुर्ण करण्यात आली. त्यावेळी मला सुतार यांचे नाव अविनाश अशोक सुतार,वय - 33 वर्षे, पद - ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, जि.प.उप विभाग बांधकाम हातकणंगले, पंचायत समिती हातकणंगले जि.कोल्हापूर (अस्थायी), रा. हनुमान मंदिर जवळ, हासुर दुमला, ता.करवीर, जि.कोल्हापूर असे असल्याचे समजले.

तरी माझी आई सुरेखा बाबासो शिंदे यांचे नावे शासनाच्या रमाई आवास घरकुल योजना सन 2023-2024 मधुन घरासाठी लाभार्थी म्हणुन 1,50,000/- रूपये मंजुर झालेले आहेत. मंजुर झालेले रक्कमेपैकी 1,00,000/- रूपये माझ्या आईच्या बँक खात्यावर जमा झाले आहेत. उरलेले पैसे कधी जमा होणार हे विचारण्यासाठी मी रमाई आवास घरकुल योजनचे काम पाहणारे अविनाश सुतार, ग्रामिण गृहनिर्माण अभियंता जि.प. उप विभाग बांधकाम हातकणंगले यांना भेटलो त्यावेळी त्यानी माझेकडे रमाई आवास घरकुल योजनेचे राहीलेले हप्ते जमा करणेसाठी स्वतःसाठी अप्रामाणिकपणे व बेकायदेशिरपणे 13,000/- रूपयांची मागणी करून तडजोडी अंती 10,000/- रूपये लाचेची मागणी केली. त्याप्रमाणे मागणी केलेले 10,000/- रूपये बेकायदेशिर स्विकारताना त्यांना अँन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कडील पथकाने पकडल्याने माझी अविनाश अशोक सुतार, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता,जि.प.उप विभाग बांधकाम हातकणंगले यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मी सांगितलेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली असुन ती मी वाचुन पाहिली असता ती खरी व बरोबर आहे.

समक्ष

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

sagar rangrao wagh(I (Inspector)) / api **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

WHC 2011

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

पोलीस ठाणे अंमलदार गांधीनगर पोलीस ठाणे. जि.कोल्हापूर.

**Name** (नाव): sagar rangrao wagh

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): api